दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.२८ सप्टेंबर २०२५ 9422660067 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ४३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 28 Sep 2025 9422660067 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 43 ● Pages 4 ● Rate 4 Rs


## राज्यातील ३१ जिल्ह्यांना अतिवृष्टीचा फटका

**मुंबई**–राज्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत झालेल्या अतिवृष्टीने शेतीचे अतोनात नुकसान झाले असून, राज्य सरकारने नुकतीच नुकसानीची आकडेवारी जाहीर केली आहे. या आकडेवारीनुसार, राज्यात एकूण ३७ लाख ९१ हजार ३२१ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. यामुळे राज्यातील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.
राज्यभरातील एकूण ३१ जिल्ह्यांना अतिवृष्टीचा तडाखा बसला आहे, त्यापैकी १७ जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक नुकसान झाले आहे. या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी १० हजार हेक्टरपेक्षा जास्त शेतजमिनीचे नुकसान झाल्याची नोंद आहे. ही आकडेवारी आजपर्यंत झालेल्या नुकसानीची आहे. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पूर आणि अतिवृष्टीमुळे पिके पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. कापूस, सोयाबीन, ज्वारी, बाजरी, मका यांसारख्या खरीप पिकांना याचा मोठा फटका बसला आहे.

# शेतकऱ्यांच्या बांधावर फोटोग्राफीचा तमाशा

## पिकं वाहून गेली, गुरं दगावली,जीव निसटले आणि राजकारणाला मिळाली फक्त पोझ देण्याची संधी!

## सत्ताधारी–विरोधक दोघेही 'संवेदनाहीन'!

### शेतकरी–फक्त राजकीय तमाश्याचा भाग

आज शेतकऱ्याच्या अंगणात दु:खाचा डोंगर कोसळला आहे. घरात चूल पेटवायला धान्य नाही, गुरांच्या अंगणात चारा नाही. शेतकरी हतबल होऊन विचारतो – आता जगायचं कसं? पण या प्रश्नाचं उत्तर कुणाकडे नाही. सत्ता आणि विरोधकांच्या भांडणांमध्ये शेतकऱ्याचा आक्रोश दाबला जातो, आणि त्याच्या जखमांवर फक्त फोटोग्राफीचा चमकदार फ्लॅश टाकला जातो.

### खरी वस्तुस्थिती

सत्ता ही घोषणांसाठी नसते, तर कामासाठी असते. विरोधक हे पोझेसाठी नसतात, तर लढ्यासाठी असतात. पण दोन्ही बाजूंनी फक्त ढोंग उभं केलं आहे. शेतकरी रडतोय, जगण्यासाठी झगडतोय, आणि राजकारण त्याच्या अश्रूंवरही नफा कमावतोय. खरी मदत, तातडीचा दिलासा, आणि संवेदनशील प्रशासन – हेच शेतकऱ्याला हवं आहे. त्याच्या डोळ्यांतून वाहणारं पाणी 'फोटोसेशन'साठी नाही, तर न्यायासाठी आहे.



बीड (प्रतिनिधी)–बीड जिल्ह्यातील मुसळधार पावसानं शेतकऱ्यांचा चक्काचूर केला. आयुष्यभराचा घाम एका रात्रीत पाण्यात गेला, उभं पीक वाहून गेलं, गुरं दगावली, कुठं जीवितहानी झाली. या आक्रोशाच्या क्षणी शेतकऱ्याला आधार देण्याऐवजी त्याच्या बांधावर सत्ताधारी आणि विरोधक राजकारणाच्या फोटोंसाठी स्पर्धा करताना दिसले. हे चित्र बघून प्रश्न पडतो – शेतकरी केवळ फोटो काढण्याचा सेट झाला आहे का?

### भाजप सरकारचा ढोंगीपणा

सत्ताधाऱ्यांनी कॅमेरासमोर सहानुभूतीचे बोल बोलले, पाठीवर थाप मारली, पंचनाम्यांचे आदेश दिले पण प्रत्यक्षात शेतकऱ्याच्या खात्यात एक पैसाही जमा झाला नाही. घोषणांचा ढोल वाजवला गेला, पण त्यात फक्त हवा होती. आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत असं सांगणाऱ्या भाजपच्या नेत्यांनी खरी मदत दिली असती, तर आज शेतकरी आपले डोळे पुसत नसता.

### विरोधकांचा दांभिकपणा

काँग्रेस–राष्ट्रवादी व इतर विरोधकांचं राजकारणही तितकंच बेगडी आहे. हे नेतेही बांधावर पोहोचतात, छायाचित्रांसाठी हावभाव करतात, घोषणाबाजी करतात पण त्यापलीकडे काही नाही. शेतकऱ्यांच्या जखमेवर मलम लावण्याऐवजी ते सत्ताधाऱ्यांना टोमणे मारून पुढची निवडणूक साधण्याच्या गडबडीत आहेत.

## दुष्काळातून सावरण्याचे बळ दे

### स्वरूपाताई रोहित पंडित यांचे त्वरित देवीला साकडे

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघात गेल्या दहा दिवसापासून जोरदार मुसळधार पावसाने थैमान घातले आहे. त्यामुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीने शेतकऱ्यांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. यातून सावरण्यासाठी बळीराजाला बळ दे असे साकडे तलवाडा येथील त्वरिता देवीला सौ स्वरूपाताई रोहित पंडित घातले आहे.
गेवराई तालुक्यात पूर परिस्थिती निर्माण झाल्याने आणि मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील उभ्या पिकाचे नुकसान झाले आहे अनेकांचे घर आणि संसार उपयोगी साहित्य वाहून गेले आहेत. यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक कणा मोडला आहे. या परिस्थितीतून त्यांना सावरण्यासाठी आणि खंबीरपणे उभा राहण्यासाठी बळ मिळावे. यासाठी सौ स्वरूपाताई रोहित



पंडित यांनी दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी तलवाडा येथील त्वरिता देवीला १९१ दुर्गा सप्तशती पाठ करून प्रार्थना करत साकडे घातले आहे. याप्रसंगी युवानेते रोहित भैया पंडित आणि सौ स्वरूपाताई पंडित यांनी देवीची आरती केली. यावेळी त्यांच्या समवेत गेवराई तालुक्यातील माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## प्रेरणादायी 'पोस्टर प्रदर्शना' तून आदिवासी क्रांतिकारकांना मानवंदना

**नवापूर । रसिक गावित**

आदिवासी जननायक भगवान बिरसामुंडा यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून पश्चिम खान्देश भिल्ल सेवा मंडळ, नंदुरबार संचलित अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, सोनखांब येथे दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी एका भव्य आणि प्रेरणादायी 'पोस्टर प्रदर्शना'चे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनातून आदिवासी क्रांतिकारकांच्या गौरवशाली इतिहासाला उजाळा मिळाला, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेची ज्योत प्रज्वलित झाली.आदिवासी विकास विभागामार्फत १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत विविध कार्यक्रमांची मालिका सुरू आहे. याच मालिकेचा एक भाग म्हणून आयोजित या प्रदर्शनात, विविध आदिवासी क्रांतिकारकांचे तेजस्वी जीवन, राष्ट्रासाठी आणि समाजासाठी त्यांनी दिलेले



अमूल्य योगदान, आणि त्यांच्या शौर्यगाथा माहितीपूर्ण पोस्टर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आल्या. या क्रांतिकारकांनी समाजात केलेला संघर्ष आणि त्यांचे बलिदान भावी पिढीला प्रेरणा देण्यासाठी एक मोठी संधी ठरली. मुख्याध्यापक अंकुर मुळे आणि प्राथमिक मुख्याध्यापक दिनेश मोरे यांच्या हस्ते फित कापून उत्साहाच्या वातावरणात पार पडले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक वृंद, अधीक्षिका व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. प्रदर्शनातील प्रत्येक पोस्टर विद्यार्थ्यांसाठी केवळ माहितीचा स्रोत नव्हे, तर त्यागाच्या आणि शौर्याच्या एका अद्भुत कथेचा अनुभव देणारा ठरला.अशा स्तुत्य उपक्रमामुळे सोनखांब आश्रमशाळेतील विद्यार्थी केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर आपल्या आदिवासी संस्कृतीचा आणि ऐतिहासिक वारसाचा अभिमान घेऊन मोठे होतील, यात शंका नाही.

## मौजे जोला गावावरील संकट तलाठी गायकवाड यांच्या सतर्कतेमुळे टळले

**केज । प्रतिनिधी**

शनिवार दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी केज तालुक्यातील मौजे जोला शिवारातील रक्ताळीचा माळ परिसरातील पाझर तलाव फुटणार अशी परिस्थिती निर्माण झाली होती . शुक्रवार दिनांक २६ सप्टेंबर रोजी दुपारी सुरू झालेला जोरदार पाऊस आज शनिवार पर्यंत सुरूच होता यामुळे रक्ताळीचा माळ शेतातील पाझर तलाव तुडुंब भरून फुटण्याची मार्गावर आहे हि नागरिकांच्या लक्षात येताच सदरील माहिती गोविंद ढाकणे , भगवान करंजकर व आसाराम ढाकणे यांनी जोला तलाठी सजा चे तलाठी रविंद्र गायकवाड यांना दिली सदरची माहिती मिळताच गायकवाड यांनी जोला गावातील तलावाकडे धाऊ घेऊन तातडीने तलावाचा सांडवा फोडण्यासाठी स्वतः हातात टिकाऊ हातात घेऊन सुरवाती केली त्यांच्या बरोबर गोविंद ढाकणे, आसाराम ढाकणे गोविंद सारुक व बाळासाहेब बिक्कड होते पण माणसाच्या हाताने शक्य नाही असे लक्षात येताच मुरलीबप्पा




ढाकणे यांनी जेसिबी मशिन बोलावुन घेत तब्बल सात तास मशिन चालवुन सांडवा खोल करून घेत मौजे जोला गावावरील धोका तलाठी रविंद्र गायकवाड साहेब यांच्या सतर्कतेमुळे टळला आहे.
हि संपूर्ण मोहीम तलाठी रविंद्र गायकवाड, भगवान सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष मुरलीधर बप्पा ढाकणे, महसूल सहाय्यक बाळासाहेब बिक्कड, गोविंद ढाकणे, अशोक जेधे, आसाराम ढाकणे, अविनाश सारुक, सखाराम ढाकणे, भगवान करंजकर, गणेश ढाकणे, गोविंद सारुक, ज्योतीराम ढाकणे ,तुकाराम सारुक यांच्यासह गावकरी यांनी यशस्वी केली आहे.

## राजा राममोहन रॉय ग्रंथालय चळवळीचे प्रणेते डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड

**केज । प्रतिनिधी**

राजा राममोहन रॉय हे भारतीय ग्रंथालय चळवळीचे प्रणेते होते असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले. दिनांक २७ सप्टेंबर २० २५ रोजी स्वानंद सार्वजनिक वाचनालय आनंदगांव ता.केज जि. बीड येथे राजा राममोहन रॉय यांची जयंती साजरी करण्यात आली.संततधार पावसा मुळे अत्यंत साधेपणाने जयंती साजरी करण्यात आली.सर्वप्रथम राजा राममोहन रॉय यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.यावेळी ग्रंथालयाचे संस्थापक




अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, ख्यातनाम वक्ते,परखड व्याख्याते,प्राचार्य डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड बोलत होते.
अध्यक्षस्थानी बाळासाहेब गायकवाड हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच रामराजे गायकवाड, बबन पुंड,संजय सोनवणे यांची उपस्थिती होती.सतत च्या पावसामुळे मोजकी वाचक मंडळी कार्यक्रमाला उपस्थित होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सुत्रसंचलन, आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंदभैय्या गायकवाड यांनी केले.

## केज तालुक्यात पुन्हा आभाळ फाटले, संततधार मुसळधार पावसाने सोयाबीन व इतर पिके गेली तर पाझर तलाव फुटण्याची भीती

**केज । प्रतिनिधी**

दिनांक २६,२७ सप्टेंबर च्या दिवशी संततधार मुसळधार पाऊस सतत चालू आहे त्यामुळे केज तालुक्यात शेकडो एकर सोयाबीन पिकाचे शंभर टक्के नुकसान झाले आहे.मांजरा नदीचे पाणी अनेक गावांमध्ये शिरले आहे मांजरा धरण ओव्हरफ्लो झाले आहे अनेक दरवाजे उघडले असून तरीसुद्धा पाणी कळंब शहरा जवळ घुसले आहे नदी काठच्या गावात पाणी शिरले असून सोयाबीन पिक तूर,कापुस,ऊस पिकाचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे सोयाबीन पिक हे शंभर टक्के गेले असून शेतकरी आता मोठ्या संकटात सापडला आहे दिवाळी कशी साजरी करणार असा प्रश्न पडला आहे मागच्या दोन तीन दिवसांपूर्वी अगोदरच अति मुसळधार पाऊस झाला होता त्यात पुन्हा आभाळ फाटले असुन एवढा मोठ्या प्रमाणात पाऊस कधीच झाला नाही घरात पाणी



शिरले शेतात कापणीला आलेले पीक पाण्यात सडत आहे जनावरे दगावली आहेत.सर्व बाजूंनी शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे अजून सुद्धा सरकारी मदत पोंहचली नाही पंचनामे करून सुद्धा सरसकट कर्जमाफी,पन्नास हजार रुपये प्रति हेक्टरी अनूदान दयावे व ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी सर्व शेतकऱ्यांनी केली आहे. दरम्यान प्रशासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज आहे. तसेच सामाजिक संस्था व लोकप्रतिनिधी यांनी सढळ हस्ते मदत करावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## जिल्हास्तरीय विज्ञान नाट्योत्सवात साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला

**केज । प्रतिनिधी**

दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षणाधिकारी व विभागीय समन्वयक, राष्ट्रीय विज्ञान नाट्योत्सव नेहरूविज्ञान केंद्र मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय विज्ञान नाट्योत्सवात साने गुरुजी निवासी विद्यालयाने सतत पाच वर्षापासून जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक मिळवून राज्यस्तरा पर्यंत मजल मारली असून यावर्षी जिल्हा स्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला आहे व यशाची परंपरा कायम ठेवली आहे.बीड येथे आयोजित स्पर्धेत या विद्यालयाने मानव कल्याणासाठी विज्ञान व तंत्रज्ञान या मुख्य विषयांतर्गत स्मार्ट शेती या उप विषयांतर्गत तंत्रज्ञानाच्या शिवारात या नाटिकेने द्वितीय क्रमांक पटकावला आहे.या नाटकात केंद्रे अंजली,गोरे सोनाली, चौरे गीतांजली,चौरे स्वाती,चौरे प्रतीक्षा, राठोड करण,राऊत स्वप्निल,फड नाथ या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता तर या नाटकाचे लेखन कु. साक्षी कराड यांनी तर दिग्दर्शन प्रा.डॉ.कविता गिते मॅडम,नैपथ्य जाधवर सर,लाइटिंग व ध्वनी श्री दस्तुरे सर, वेशभूषा श्रीमती शेख व जोशी मॅडम यांनी केली होती.यायशस्वी परंपरे साठी शाळेच्या व संस्थेच्या वतीने संस्था अध्यक्ष अँड.उद्धवराव कराड साहेब,श्री कापसे सर,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.



संपादकीय

# अजित पवारांची विदर्भात पक्षबांधणी ?

शरद पवारांची खरी ताकद ही पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्येच राहिलेली आहे. उर्वरित महाराष्ट्रात कुठे कुठे एखाद दुसरा आमदार त्यांच्यासोबत येत राहिला. मात्र विदर्भातील त्यांचा आमदार किंवा खासदार पवारांच्या पाठिंब्यापेक्षा स्वतःच्या संपर्काच्या जोरावरच निवडून येत असे. दुसरे असे, की शरद पवारांनी विदर्भात आपले पाय रोवण्यासाठी कधी फारसे प्रयत्न देखील केले नाहीत. किंबहुना विदर्भाला ते गृहीतच धरत राहिले. पवार मुख्यमंत्री असताना किंवा नंतर काँग्रेस, राष्ट्रवादी आघाडीच्या काळातही (जेव्हा आघाडी सरकारचा रिमोट कंट्रोल शरद पवारांच्याच हाती होता) शरद पवारांनी विदर्भाला फारसे काही दिले नाही. उलटपक्षी विदर्भाचा अनुशेष कसा वाढता राहील हाच प्रयत्न त्यांनी केला. जेव्हा नितीन गडकरी, रणजित देशमुख, बी. टी. देशमुख अशा वैदर्भीय आमदारांनी प्रयत्न करून राज्यपालांना घटनेचे ३७१/२ कलम लागू करायला लावले आणि अर्थसंकल्पात विदर्भासाठी वेगळी तरतूद करायला सरकारला भाग पाडले गेले, त्यावेळी देखील राज्यपालांना इतके अधिकार नकोतच, त्यासाठी घटना दुरुस्ती व्हायला हवी, अशीही भाषा शरद पवारांनी त्यावेळी वापरली होती. परिणामी नागपुरात दत्ता मेघे, अनिल देशमुख, रमेश बंग, अमरावतीत हर्षवर्धन देशमुख, गोंदियात प्रफुल्ल पटेल, तर यवतमाळमध्ये नाईक परिवार आणि बुलढाणा परिसरात शिंगणे परिवार हेच पवारांचे पॉवर पॉइंट्स राहिले. कारण या सर्वांचीच स्वतःची अशी वेगळी ताकद होती. यातील दत्ता मेघे, प्रफुल्ल पटेल असे दिग्गज पवारांपासून वेगळे झाल्यावर अनिल देशमुख दरमहा १०० कोटी जमवण्याच्या आरोपात तुरुंगात गेल्यापासून आता पवारांना विदर्भात फारसे काही अस्तित्व देखील उरलेले दिसत नाही. मात्र अजित पवारांनी आपल्यासोबत प्रफुल्ल पटेल यांसारखे वैदर्भीय दिग्गज घेतलेले आहेत. पटेल हे शरद पवारांचे निकटवर्ती होते.इतकेच काय तर पवारांचे अर्थकारणही काही वेळा ते सांभाळत होते. मात्र सुप्रिया सुळेंना पुढे आणून इतर जुन्या कार्यकर्त्यांना मागे ढकलण्याचा जो शरद पवारांचा प्रयत्न होता, त्याने दुखावलेले सर्व नेते अजित पवारांसोबत आले आणि आज महाराष्ट्रात शरद पवारांचे अस्तित्व दहा आमदारांवर आले आहे. अजितदादांनी पक्षाची सूत्रे आपल्या हातात घेऊन जेमतेम दोन वर्षे झाली आहेत. त्यातील बराचसा काळ आधी विधानसभा अध्यक्ष मग निवडणूक आयोग अशी भांडण करण्यात गेला आणि पुढला काळ निवडणुकांमध्ये गेला. आता पुरेसे आमदार सोबत घेऊन दादा सत्तेत स्थिरावलेले आहेत. त्यामुळे आता संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या पक्षाचे अस्तित्व कसे निर्माण करता येईल हा त्यांचा प्रयत्न चांगलाच म्हणावा लागेल. गेल्या आठवड्यात झालेल्या चिंतन शिबिरात अजितदादा सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे चांगलेच आक्रमक होते. विदर्भाला सतत गृहीत धरून चालायचे फारसे महत्त्व द्यायचे नाही हीच शरद पवारांची भावना होती. त्यामुळे त्यांच्या मंत्र्यांची आणि आमदारांची देखील तीच भावना होती. मग राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री विदर्भात यायचे ते टाइमपास किंवा श्रमपरिहार करण्यासाठी. नागपूर करारानुसार विधिमंडळाचे एक अधिवेशन नागपुरात होते. पश्चिम महाराष्ट्रातले मंत्री आणि आमदार हे अधिवेशन म्हणजे हुरडा पार्टीचे आणि पर्यटनाचे अधिवेशन म्हणूनच बघत असतात. फारसे कोणीच गंभीर नसतात. हीच बाब अधोरेखित करत प्रफुल्ल पटेलांनी आपल्या पक्षाच्या सर्वच मंत्र्यांना खडे बोल सुनावले आहे. विदर्भात येताना पर्यटनासाठी येऊ नका, तर इथे येऊन जनतेची कामे करा आणि कार्यकर्त्यांना सुद्धा वेळ देत चला. तरच तुमच्या इथे येण्याचा फायदा होईल. अन्यथा नुसते दोन तासांसाठी इथे येऊ नका. आम्ही तुमचे स्वागत करणार नाही. असेच प्रफुल्लभाईंनी आपल्या मंत्र्यांना सुनावले आहे. अजित पवारांनी देखील आमदार आणि मंत्र्यांनी आपापल्या मतदारसंघात वेळ दिलाच पाहिजे, कार्यकर्त्यांना भेटून त्यांची कामे केलीच पाहिजेत आणि सामान्यांशी संपर्क ठेवायलाच हवा, असे ठणकावले आहे. यामुळे कार्यकर्ते आणि मंत्री यांच्यात संवाद प्रस्थापित व्हायला निश्चित मदत होणार आहे.कार्यकर्ते अनेकदा जनसामान्यांचे प्रश्न घेऊनच मंत्र्यांकडे जात असतात. मंत्र्यांनी किमान शांतपणे ऐकून तरी घ्यावे ही त्यांची अपेक्षा असते. तसे झाले नाही तर कार्यकर्ते दुरावतात. त्यामुळे कार्यकर्त्यांशी आणि जनतेशी संपर्क हे महत्त्वाचे सूत्र दादांनी आपल्या मंत्री आणि नेत्यांना पाळायला सांगितले आहे. विशेष म्हणजे जे नेते किंवा लोकप्रतिनिधी जनतेशी संपर्क ठेवणार नाहीत त्यांनी सरळ खुर्ची सोडावी असेच दादांनी सुनावले आहे. अशा कार्यकर्त्यांना निवडणुकीत उमेदवारी दिली जाणार नाही किंवा पक्षात देखील पदे दिली जाणार नाहीत, असा इशाराच त्यांनी दिला आहे. त्याचवेळी जे कार्यकर्ते चांगले काम करतील त्यांना पक्षात योग्य असे प्रमोशन देखील दिले जाईल हे दादांनी स्पष्ट केले आहे. जनता आणि पक्ष तसेच प्रशासन यांच्यात संवाद ठेवण्यासाठी दर तीन महिन्यांनी जनसंवादाचा कार्यक्रम घेतला जाईल आणि त्यात सर्व नेते थेट जनतेच्या दारी जाऊन संवाद साधतील आणि त्यांच्या तक्रारी ऐकून त्याची सोडवणूक करतील असेही दादांनी सांगितले आहे. सध्या महाराष्ट्रात आरक्षणाचा मुद्दा घेऊन मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष पेटलेला आहे. हेच सूत्र पकडत पक्षाचे एक ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी एकूणच ओबीसीवर अन्याय कसा होतो आहे ही बाजू या शिबिरात बोलताना मांडली. मात्र त्याचवेळी अजितदादांनी समाजासमाजात तेढ निर्माण करू नका असेही सुचवले आहे. त्याच वेळी पक्षाच्या प्रवक्त्यांनी देखील माध्यमांशी बोलताना विचार करून आणि भान राखून बोलावे अशा कानपिचक्या दिल्या आहेत. या शिबिरात जनतेशी अधिक संपर्क पक्ष संघटनेला बळकटी देणे, संविधानाबाबत मार्गदर्शन करणे, सरकार आणि पक्षांमध्ये समन्वय ठेवणे, संतुलित विकासाची दृष्टी ठेवणे, भाजपशी असलेली आघाडी मजबूत करणे, महिला सक्षमीकरण, पारदर्शक प्रशासन, विद्यार्थी आणि युवकांसाठी पोषक असे पक्षाचे धोरण हे मुद्दे देत पुढे जाण्याचा संकल्प या शिबिरात करण्यात आला असून हा संकल्प नागपूर डिक्लरेशन या नावाने करण्यात आला आहे. एकूणच शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष राजकीय विश्लेषकांच्या भाषेत साडेतीन जिल्ह्यांचा पक्ष म्हणून ओळखला जात होता. ती ओळख पुसून पक्षाला खरे महाराष्ट्रव्यापी स्वरूप देण्यासाठी अजित दादा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कंबर कसली आहे, हेच नुकत्याच झालेल्या या चिंतन शिबिराच्या बाबत जे काही वृत्त प्रसारित झाले आहे त्यावरून दिसून येत आहे.

# बीड हा अतिशय संवेदनशील जिल्हा ?

बीड हा अतिशय संवेदनशील जिल्हा होता आणि आजही आहे. कारण ही तसेच आहे. मागील काही दिवसांपासून आपण बघितले तर खुनाचे सत्र हे सुरूच आहे. मुख्यतः यात मृत हे जास्तीत जास्त तरुण वर्गातील आहे. तरुणवर्ग का असा करतोय? यामागे राजकारण काही काम करते का? मुळ तरुणांची मानसिक स्थिती बदलली पाहिजे का? शासन प्रशासन या गोष्टी घडण्यास किंवा रोखण्यास कमी पडत आहे का? जिल्ह्याची सुरक्षा वाढवण्याची गरज आहे का? तरुण वर्गाला प्रहासोबत आणण्यासाठी काय करता येईल? शुल्लक गोष्टीवरून वाद टाळल्या जाऊ शकता का? असे लाख प्रश्न कालपासून डोक्यात येऊन गेले.

वरील सर्व परिस्थिती ही खरंच खूप भयानक झालेली आहे काल आमचे वरिष्ठ पत्रकारांच्या मुलाचा खून झाला आणि एकच गोंधळ डोक्यात उडाला. जर एका सुशिक्षित, चांगल्या घरातील मुलाचे हे हाल असतील तर गोर-गरीब लोकांचे काय असतील. असे कृत्य करणाऱ्यांना का कायद्याचा धाक वाटत नसेल. का कोणाची दया, कनवळा येत नसेल. असे कोणते वाद आहेत की ते जीव घेतल्या नंतरच संपुष्टात येतील. वाद एवढे प्रखर झाले आहे की, त्यासाठी जीवाची किंमतच मोजावी लागत आहे. का एवढी राक्षसी मानसिकता या लोकांमध्ये वाढली. खरंच मन विचार करून अक्षरशः हतबल झाले आहे आणि यातून काहीच मार्ग सुचायला देखील तयार नाही. तिऱ्हाईत लोकांचे हे हाल असतील तर त्या मुलाच्या आईबापाचे काळीज काय म्हणत असेल जरा कल्पना करा. रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मुलगा बघून काय जीव बोलला असेल त्या आई-बापाचा मन सुन्न होऊन जात. लाडाने अंगा खांद्यावर वाढवलेलं मुल अचानक असं बघणे म्हणजे मरणाहून मरण यातना त्या आई-वडिलांच्या असतील. या सर्व परिस्थितीला जबाबदार कोणीही असेल परंतु, यापुढे बीड जिल्ह्यात चौका-चौकात पोलिस असावे, सीसीटीव्ही असावेत, प्रत्येक व्यक्तीच्या कधीही, कुठल्याही चौकात झडती व्हावी जेणे करून हत्यारे बाळगणे बंद होईल. व अश्या सर्व प्रकारावर काही प्रमाणात का होईना आळा बसेल. Prevention is better than cure हे वाक्य पोलिस यंत्रणेने लक्षात घ्यावे. त्याच बरोबर तरुण वर्गासाठी संस्कार घडतील असे काही कार्यक्रम, तसेच सामाजिक विभागामार्फत उपक्रम घ्यावे. जेणे करून तरुणवर्ग षड्रिपु पासून दूर राहील. यासाठी सर्वांनीच समोर यावे लागेल. तरच आपल्या बीडची प्रतिमा उजळेल, नसता आज त्यांचा कोणीतरी, तर उद्या आपला कोणीतरी नक्कीच बळी पडेल. तात्पर्य हेच की, गेलेला जीव तर परत येऊ शकत नाही, पण भविष्यात असे जीव जाऊ नये म्हणून, त्यासाठी आपण सर्व सुज्ञ नागरिक म्हणून हे नक्कीच करू शकतो.

**ज्योत्स्ना चव्हाण गायकवाड.**
**संपर्क: ९७६४२२३५३४**
Email:
newswindow1gmail.com

# कुंबेफळ येथे महिलांच्या आरोग्य तपासणीने भर पावसात स्वस्थ नारी सशक्त परिवार मोहीम यशस्वी

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील कुंबेफळ येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्राम पंचायत कार्यालय कुंबेफळ व आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्र उत्सवानिमित्त कुंबेफळ गावातील महिलांच्या आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात महिलांनी मोठ्या संख्येने आरोग्य तपासणी करून घेतली स्वस्थ नारी सशक्त परिवार ही मोहीम यशस्वी झाली.




या शिबिरामध्ये स्त्री रोग तज्ञ डॉ.योगेश्वरी थोरात व युसूफवडगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.सुमित्रा नागरे यांनी महिलांची आरोग्य तपासणी करत महिलांना मार्गदर्शन केले.महिलांचे आरोग्य म्हणजे स्त्रियांच्यासंपूर्ण शारीरिक,मानसिक आणि भावनिक कल्याणाचा विचार करणे होय,ज्यामध्ये मासिक पाळी,गर्भ धारणा,रजोनिवृत्ती आणि स्त्रीरोगविषयक समस्या तसेच हृदयरोग आणि मधुमेह या सारख्या महिलांमध्ये भिन्न पद्धतीने परिणाम करणाऱ्या आजारांचा समावेश होतो. महिलांच्या आरोग्या साठी योग्य आहारा बरोबरच नियमित व्यायाम आणि वार्षिक आरोग्य तपासण्या महत्त्वाच्या आहेत व सद्यस्थिती मध्ये घर सांभाळत सांभाळत महिला भगिनी आपले लहान मोठे आजार हे अंगावरच काढताना दिसून येत आहे.परंतु कालांतराने हे आजार शरीरावर विपरीत परिणाम करतात म्हणून महिलांनी वेळीच आपली नियमित तपासणी करणे गरजेचे आहे असे केज येथील स्त्रीरोगतज्ञ डॉ.योगेश्वरी थोरात यांनी व्यक्त केले.

शिबिरात किशोरवयीन मुलींच्या व महिलांच्या हिमोग्लोबिन,थायरॉईड, मधुमेह,रक्तदाब इत्यादी तपासण्या करण्यात आल्या.शिबिर यशस्वी करण्यासाठी कुंबेफळ गावचे सरपंच व त्यांची टिम आणि प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी,आरोग्य सेवक,प्रयोगशाळा तंत्रज्ञ,आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका व ग्रामपंचायतच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# तात्यांचे तर्कट...

जगातील पहिल्या पाचांत स्थान मिळविलेली भारताची अर्थव्यवस्था 'मृत' असल्याचे विधान, हे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे अजब तर्कट आहे. सध्या त्यांना रोज नवनवे जावईशोध लागत आहेत. भारताशी सहकार्याबाबत उत्सुक असलेले ट्रम्प यांना अचानक ही अर्थव्यवस्थाच मृत असल्याचा साक्षात्कार होण्यामागे अनेक कारणे आहेत. त्यातले ताजे कारण म्हणजे भारत आणि रशिया या पूर्वीपासूनच्या मित्रदेशांची अधिक दृढ झालेली मैत्री. साऱ्या जगावर आयातशुल्काचे अस्त्र उगारणाऱ्या ट्रम्प यांनी भारतासोबत रशियालाही त्यांच्या मृत अर्थव्यवस्थांच्या यादीत ढकलून 'दोन्ही देश गाळात जाणार,' अशी शापवाणीही उच्चारली आहे.



ट्रम्प यांच्या दिवसाकाठी बदलणाऱ्या भूमिका हळूहळू जगाला सवयीच्या होऊ लागल्या आहेत, त्यामुळे त्यांचे हे तिरकस आणि तथ्यांशी फारकत घेणारे विधानही फार गांभीर्याने घेण्याची गरज नाही; परंतु ही व्यक्ती ज्या खुर्चीत बसली आहे, ते जगातील सर्वांत शक्तिशाली पदांपैकी एक असल्याने त्याकडे दुर्लक्षही करता येणार नाही. अनेक जगन्मान्य कसोट्यांवर भारत ही जिवंत, मजबूत पायावर उभी असलेली आणि वर्धिष्णू अशी सक्षम अर्थव्यवस्था आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, आशियाई विकास बँक आणि अनेक जागतिक ख्यातीच्या रेटिंग संस्थांनी भारताच्या या स्थानावर वेळोवेळी शिक्कामोर्तब केले आहे. नुकतेच भारताने जगातील पहिल्या पाच अर्थव्यवस्थांमध्ये स्थान मिळवले. देशात ८० अब्ज डॉलरची थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) असून त्यात दिवसेंदिवस भर पडत आहे. अमेरिकेसह जगातील अनेक आघाडीच्या कंपन्यांनी भारतामध्ये आपली केंद्रे उघडली आहेत. देशाची निर्यात पावणेआठशे अब्ज डॉलर असून, पावणेसातशे अब्ज डॉलर इतकी परकी चलनाची गंगाजळी आहे. 'इझ ऑफ डुइंग बिझनेस'च्या यादीत भारताने १४२व्या क्रमांकावरून ६३व्या स्थानावर झेप घेतली आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्येच्या खंडप्राय देशाने विकासाचा वेगही सहा टक्क्यांच्या वर राखला आहे. गेल्या काही काळात भारतातील करसुधारणा, पायाभूत सुविधांमध्ये केलेली गुंतवणूक, 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' यासारख्या योजना, तसेच डिजिटल व्यवहारांची घट्ट पाळेमुळे यांमुळे आर्थिक आघाडीवर देशाचे स्थान उंचावत आहे. अशा स्थितीत भारतावर २५ टक्के आयातशुल्कासह दंडही लागू करण्यापाठोपाठ ट्रम्प यांनी भारत आणि रशियाला दूषणे देण्यामागील पार्श्वभूमी पाहणे महत्त्वाचे आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ट्रम्प यांच्या सुरात सूर मिसळणे मात्र शुद्ध अपरिपक्वतेचे लक्षण आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत काही दोष नक्कीच आहेत; पण धोरणांबाबत मतभेद असले, तरी अशा निसरड्या परिस्थितीत जपून व्यक्त होणे गरजेचे आहे.

स्वातंत्र्यानंतर भारताने अलिप्ततावाद स्वीकारला असला, तरी रशिया हा आपला पूर्वीपासूनचा विश्वासू सहकारी आहे. सोबतच रशियाकडून होणाऱ्या तेलखरेदीमध्ये भारताची अब्जावधींच्या परकीय चलनाची बचत होत आहे. व्यापार आघाडीवरील भारताची संरक्षणवादी धोरणे ट्रम्प यांना पूर्वीपासून खटकत आहेत. तसेच जागतिक स्तरावर एकत्र येऊन डॉलरला पर्याय आणि भविष्यात आव्हान उभे करू पाहणाऱ्या 'ब्रिक्स'च्या व्यासपीठावर त्यांचा पूर्वीपासून राग असून, तेथील भारताचे स्थानही त्यांच्या डोळ्यांत सलत आहे. नुकतीच त्यांनी 'ब्रिक्स' देशांनाही आयातशुल्काची धमकी दिली आहे. भारताने ब्रिटनशी मुक्त व्यापार करार केला असून अन्य युरोपीय देशांशीही वाटाघाटी प्रगतिपथावर आहेत.अमेरिकेशीही तशाच कराराबाबत चर्चा असली, तरी अनेक जाचक अटी भारताला मान्य नसल्याने ती चर्चा पुढे सरकलेली नाही. आपण रशिया-युक्रेन युद्ध थांबविण्यासाठी प्रयत्न करीत असताना भारताने रशियाकडून तेलखरेदी करणे अयोग्य असल्याचे ट्रम्प यांचे म्हणणे आहे; परंतु हे युद्धच अमेरिकेने दिलेल्या शस्त्रांनिशी लढले जात असल्याचा त्यांना सोयीस्कर विसर पडलेला दिसतो. सोबतच ज्या रशियाशी दोस्तीबाबत ट्रम्प नाराज आहेत, त्या व्लादिमिर पुतिन यांची अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मदत घेतलेल्या त्यांच्यावरील आरोपांचे धुके अजूनही विरलेले नाही. भारताची अर्थव्यवस्था गाळात जाणार, अशी त्यांना चिंता दिसते; पण दुसरीकडे दहशतवादाचा पाठीराखा असलेल्या पाकिस्तानला मात्र ते गोंजारत असल्याचा विरोधाभास लपत नाही. ट्रम्प यांनीच सुरू केलेल्या वाक् युद्धात रशियाचे माजी अध्यक्ष दिमित्री मेदवेदेव यांनी केलेल्या अण्वस्त्रांच्या उल्लेखामुळे अमेरिका आणि रशियातील तणाव वाढला आहे. सद्यस्थितीत तशी आक्रमक भूमिका घेणे आपल्याला शक्य नाही; परंतु ट्रम्प 'अमेरिका फर्स्ट'चा नारा देत असतील, तर आपणही 'इंडिया फर्स्ट' ची ठाम भूमिका घेतलीच पाहिजे.

# शासकीय विभागांनी समन्वय ठेवत अतिवृष्टीग्रस्तांना दिलासा देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करा-पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

भारतीय हवामान विभागाने २८ व २९ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग, जलसंधारण, जलसंपदा, बांधकाम, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व जिल्हा परिषद पाटबंधारे विभाग यांसह सर्व आपत्तीशी संबंधित विभागांनी एकमेकांत समन्वय ठेवून अतिवृष्टीपासून सर्वसामान्य शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तात्काळ कराव्यात, अशा सूचना राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज येथे दिल्या.अतिवृष्टीमुळे पाथर्डी व शेवगाव तालुक्यातील शेतपीक, शेतजमीन तसेच इतर नुकसानीची पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सलग दुसऱ्या दिवशी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी आमदार मोनिका राजळे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी,



उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, तहसीलदार उद्धव नाईक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी पी. बी. गायसमुद्रे आदी उपस्थित होते.मागील ६० वर्षांत न झालेल्या एवढ्या मोठ्या प्रमाणात शेवगाव व पाथर्डी तालुक्यात अतिवृष्टी झाली आहे. या दोन्ही तालुक्यातील सुमारे १ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. पिकांचे नुकसान झाले, बंधारे फुटले, पुलांची पडझड झाली. पाण्याच्या दबावामुळे जुने पाझर तलाव गळतीस लागले आहेत. राष्ट्रीय महामार्गावरील पूलाच्या बाजू खचल्या आहेत.अतिवृष्टीने बाधित सर्व क्षेत्राचे सरसकट पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिथे थेट प्रत्यक्ष पाहणी करणे शक्य नाही, अशा ठिकाणच्या क्षेत्राचे ड्रोनद्वारे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या जमिनी वाहून गेल्या आहेत. जमिनीचा पोत सुधारण्यासाठी व जमिनीचे पुनर्भरण करण्यासाठी शेतकऱ्यांना गाळ उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येईल, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.आपत्तीच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून शेतकऱ्यांनी धैर्य सोडू नये. या आपत्तीला धीराने सामोरे जावे. येत्या दहा दिवसांत सर्व अतिवृष्टीग्रस्त क्षेत्रांचे पीक पंचनामे पूर्ण करून शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई देण्यात येईल, अशी ग्वाही श्री. विखे पाटील यांनी दिली.पाथर्डी तालुक्यातील माळी बाभुळगाव, पाथर्डी, मोहटा, कारेगाव, करंजी व परिसर, तसेच शेवगाव तालुक्यातील भातकुडगाव, भायगाव व परिसरातील गावांची पालकमंत्र्यांनी गुरुवार, दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री उशिरापर्यंत पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधत पालकमंत्र्यांनी त्यांना धीर दिला.

# सांगवी पाटण येथे सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

## या अखंड हरिनाम सप्ताहाचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा-भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री

**आष्टी । रविंद्रनाथ ठाकूर**

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा ७५० वा जन्मोत्सव (सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सव) तसेच ब्रह्मलीन संतश्री महंत शंकरपुरी मंगळपुरी महाराज पुण्यतिथी सुवर्ण महोत्सव सोहळ्याची सुरुवात गुरुवार दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी वैराग्यमूर्ती श्री सुदर्शन महाराज यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. हा सोहळा दि.९ ऑक्टोबर २०२५ पर्यंत भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

कार्यक्रमाची सांगता महंत काशीनाथ महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाने होणार आहे.

**दैनंदिन धार्मिक उपक्रम** –पहाटे काकडा भजन, सकाळी श्री ज्ञानेश्वरी पारायण,दुपारी ज्ञानसत्र, संध्याकाळी हरिपाठ तर रात्री हरिकिर्तन व संगीत भजन अशा विविध कार्यक्रमांनी परिसरातील वातावरण हरिभक्तिमय होणार आहे.

**प्रवचन व कीर्तनकार**–ह.भ.प.उमेश महाराज दशरथे (आळंदी),ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकीकर (जळगाव), ह.भ.प. रामराव महाराज ढोक (नागपूर), ह.भ.प. उल्हास महाराज सूर्यवंशी (आळंदी), ह.भ.प. जयवंत महाराज बोधले (पंढरपूर), ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर), न्यायाचार्य महंत नामदेव महाराज (भगवानगड) यांसह अनेक संत प्रवचन व कीर्तनातून अध्यात्मिक मार्गदर्शन करणार आहेत.

**संगीत भजनाचे वैशिष्ट्य**–संगीतकार पंडित कल्याणजी गायकवाड,भजनसम्राट संगीतविशारद इंद्रमान गुरुजी,संगीत अलंकार सदानंद गुरुजी मगर,इंडियन आयडॉल राहुलजी खरे,संगीत अलंकार झूका गुरुजी यांसह पंचक्रोशीतील नामवंत गायक व मृदंगाचार्य आपली कला सादर करणार आहेत.

**महंत स्थापना सोहळा**–बुधवार दि. ८ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत महंत काशीनाथ महाराज शास्त्री यांचा २१ वे महंत स्थापना सोहळा आयोजित करण्यात आला आहे.हा सोहळा भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.या महोत्सवाचे आयोजन समस्त ग्रामस्थ सांगवी (पाटण) व पंचक्रोशीतील संतसेवक मंडळींनी केले असून,परिसरातील भाविक व वारकरी संप्रदाय यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.



# साकेश्वर ग्रामीण विकास संस्थेत सायबर जागरुकता कार्यक्रम संपन्न

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**



सायबर पोलीस स्टेशन यांच्या मार्फत साकेश्वर ग्रामीण विकास संस्था, अडसुळ टेक्निकल कॅम्पस, चास येथे सायबर विषयावरील जागरुकता कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमास पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम, प्रा. अनिरुद्ध अडसुळ, प्राचार्य डॉ. प्रदीप पाटील, डॉ. अंकुश शिर्के, डॉ. दिनेश अडोकर, श्रीमती प्रियंका कंधारे, वैभव लोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम यांनी उपस्थित विद्यार्थी-विद्यार्थिनींना डिजिटल अरेस्ट, मोबाईल हॅकिंग, फेक अकाउंट या विषयांबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच आर्थिक फसवणुकीपासून कसे वाचावे, सायबर गुन्हे तपासाची पद्धत, सायबर कायदे आदींबाबत मार्गदर्शन केले.

पोलीस नाईक अभिजीत अरकल यांनी डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, बँक तपशील व ओटीपी शेअर न करणे, व्हॉट्सॲप व्हिडिओ कॉलद्वारे होणारी फसवणूक, बँकेच्या नावाने येणाऱ्या एपीके लिंक/फाईल्स, बनावट कॉल, लॉटरी लागल्याचे खोटे आश्वासन, शेअर्समध्ये गुंतवणूक करून जास्त परतावा, टार्गेट पूर्ण केल्यावर पैसे मिळणे, व्हिडिओ शेअर करून पैसे मिळणे अशा विरविध आमिषांद्वारे नागरिकांची लूट कशी केली जाते, याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच फेक वेबसाईट्स, मोबाईल हॅकिंग, बँक पासवर्ड आणि सुरक्षा अपडेट याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.


कार्यक्रमादरम्यान विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विचारलेल्या शंकांचे निरसन करण्यात आले.

हा उपक्रम पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ घार्गे आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पोलीस नाईक अभिजीत अरकल, महिला पोलीस हवालदार सविता खताळ, पोलीस नाईक दीपाली घोडके तसेच मोहम्मद शेख यांनी परिश्रम घेतले.

# ओला दुष्काळ जाहीर करून तात्काळ मदत देऊन शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करा

## जिजाऊ ब्रिगेडची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**



महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी तसेच संपूर्ण कर्जमाफी जाहीर करावी, या मागणीसाठी जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

या प्रसंगी अहिल्यानगर दक्षिण जिल्हा अध्यक्षा नंदिनी सोनाळे, जिल्हा सचिव वंदना निघुट, माजी जिल्हाध्यक्ष संपूर्ण सावंत, अँड. अनुराधा येवले, मीनाक्षी वागस्कर, प्रतिभा सोनाळे, योगिता कर्डिले, कांता बोठे, रोहिणी नलावडे, वैशालीताई जिवडे, रूपालीताई कराडे, निर्मलाताई काळदाते, प्रमिलाताई पवार, प्रतिक्षा भुकन, स्वाती झुंबरे, रेखाताई घोरपडे, प्रीती तळेकर आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

निवेदनात म्हटले आहे की, अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे संपूर्ण महाराष्ट्रासह अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ही परिस्थिती तातडीने नियंत्रणात आणली नाही तर शेतकरी कुटुंबीय उपासमारीच्या संकटाला सामोरे जातील तसेच शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढेल. त्यामुळे पंचनाम्यांच्या भानगडीत न पडता सर्व शेतकऱ्यांना तातडीने मदत जाहीर करावी आणि त्यांच्यावरची संपूर्ण कर्जमाफी करावी, अशी मागणी जिल्हा जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली आहे.

# माहिती अधिकार दिन सोमवारी साजरा करण्याबाबत निवेदन



**सोलापूर । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय स्तरावर २८ सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिन म्हणून साजरा केला जातो. मात्र यावर्षी २८ सप्टेंबर २०२५ हा दिवस रविवार असल्याने माहिती अधिकार दिन सोमवार दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्याबाबत करमाळा तालुका माहिती अधिकार कार्यकर्ता संघटनेच्या वतीने विविध शासकीय कार्यालयांना निवेदन देण्यात आले.

शुक्रवारी करमाळा तहसीलदार, गटविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक, तालुका भूमी अभिलेख कार्यालय, सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय, करमाळा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तसेच उप अभियंता महावितरण यांच्या नावे हे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, शासन निर्णयानुसार २८ सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिन म्हणून पाळला जातो. मात्र या वर्षी तो दिवस रविवार असल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी काढलेल्या पत्रकानुसार सोमवार दि. २९ सप्टेंबर रोजी माहिती अधिकार दिन साजरा करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सर्व शासकीय कार्यालयांनी माहिती अधिकार दिन उपक्रम राबवून साजरा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे करमाळा तालुकाध्यक्ष विशाल परदेशी, तालुका उपाध्यक्ष दिलीप क्षीरसागर, शहराध्यक्ष आझाद शेख, तालुका संघटक फारुक जमादार, उपसंघटक देविदास साळुंखे, तालुका प्रचारक विशाल राठोड, संपर्क प्रमुख अंगद भांडवलकर तसेच माहिती अधिकार कार्यकर्ते आयुब शेख उपस्थित होते.

# नमो युवा रन स्पर्धेच्या फलकाचे अनावरण पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते

**अहिल्यानगर । सुयश नरसाळे**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त नशामुक्त भारताच्या निर्मितीसाठी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा, जिल्हा अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या नमो युवा रन स्पर्धेचे फलक अनावरण पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते २५ सप्टेंबर रोजी पार पडले. या प्रसंगी सभापती राम शिंदे यांच्यासह जिल्ह्यातील आमदार, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.ही स्पर्धा २८ सप्टेंबर रोजी सकाळी सात वाजता छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते सारडा कॉलेज या मार्गावर होणार आहे. १४ वर्षांवरील सर्व युवक-युवतींसाठी खुली असलेली ही स्पर्धा छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, स्वस्तिक चौक, आयुर्वेद कॉर्नर, नेप्ती नाका, दिल्ली गेट, न्यू आर्ट्स कॉलेज मार्गे सारडा कॉलेज ते पुन्हा स्मारक या मार्गावर पार पडेल. स्पर्धेत पुरुष आणि महिला गटासाठी मोठ्या प्रमाणा०र पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांक विजेत्याला २१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ११ हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी ७५०० रुपये तर प्रत्येकी तीन उत्तेजनार्थ पारितोषिके म्हणून एक हजार रुपये व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक खेळाडूस प्रमाणपत्र आणि स्पोर्ट्स किट दिले जाणार आहे.या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडू हा अहिल्यानगर जिल्ह्यातील रहिवासी असावा हा महत्त्वाचा निकष ठेवण्यात आला आहे. जिल्ह्यातील युवक-युवतींनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ड. रुद्रेश अंबाडे यांनी केले आहे.

# ५,००० रोख,५ किलो गहू,५ किलो तांदूळ, पुरेसे नाही-केंद्राकडे मदत मागितली

## अजित पवार यांनी व्यक्त केला मदतीचा विश्वास



**पुणे (वृत्तसंस्था)**–उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्यातील पूरग्रस्त भागांचा दौरा करताना परिस्थितीची थेट माहिती घेतली. त्यांनी सांगितले की, कालही मी त्या भागात होतो आणि तिथे अजूनही पाऊस सुरू होता. अनेक नागरिक असुरक्षित ठिकाणी थांबले होते, त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. सैन्य, एनडीआरएफ आणि प्रशासनाच्या मदतीने हेलिकॉप्टरद्वारेही सुटका करण्यात आली आहे.या संदर्भात अजित पवार म्हणाले की, प्रशासन पूर्णपणे बचावकार्य आणि मदतकार्यात गुंतले असून, पुरामुळे घरं उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांना ५,००० रुपये रोख मदत, तसेच ५ किलो गहू आणि ५ किलो तांदूळ यांसह आवश्यक धान्य उपलब्ध करून दिले जात आहे. मात्र त्यांनी याचबरोबर एक गंभीर मुद्दा मांडला, ज्या कुटुंबांचे घरातील सामान, संसारोपयोगी वस्तू पाण्यात वाहून गेल्या आहेत. त्यांची तात्पुरती सोय शाळा आणि इतर ठिकाणी केली आहे, पण जेव्हा ते घरी परततील तेव्हा त्यांना आणखी मदतीची गरज भासेल.

अजित पवार यांनी सांगितले की, पूरग्रस्त कुटुंबांना मिळणारी १० किलो धान्याची मदत अपुरी आहे. या कुटुंबांचा संसारच उद्ध्वस्त झाल्याने त्यांना अतिरिक्त मदतीची गरज आहे. त्यामुळे त्यासाठी अधिक तरतुदीची मागणी करण्यात येत आहे. यासोबतच केंद्र सरकारचेही त्यांनी लक्ष वेधले. काल गृहमंत्री अमित शहा मुंबईत आले होते. त्यांच्याकडेही आम्ही अतिरिक्त मदतीची मागणी केली आहे. शिवाय, आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही पत्राद्वारे कळवले आहे की, मराठवाड्याला शक्य तितकी जास्तीत जास्त मदत मिळावी, असे त्यांनी स्पष्ट केले.अजित पवार यांनी यावेळी आठवण करून दिली की, गेल्या महिन्यात पंजाबसह उत्तर भारतातील काही राज्यांत पुरस्थिती निर्माण झाली होती आणि केंद्र सरकारने तिथे मदत केली होती. त्यामुळे महाराष्ट्रालाही तशीच मदत मिळेल, असा त्यांचा विश्वास आहे.

पूरामुळे हवालदिल झालेल्या लोकांना दिलासा देताना अजित पवार म्हणाले की, आमचं प्रशासन रात्रंदिवस काम करत आहे. पूरग्रस्तांसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. ज्यांची घरं कोसळली आहेत, ज्यांचा संसार वाहून गेला आहे त्यांना योग्य भरपाई मिळेल. त्यांनी स्पष्ट केले की तातडीने दिल्या जाणाऱ्या मदतीसोबतच दीर्घकालीन पुनर्वसनाची गरज आहे. लोकांना फक्त अन्नधान्य किंवा तात्पुरते आसरे पुरेसे नाहीत. त्यांना त्यांच्या आयुष्याचा पाया पुन्हा उभारण्यासाठी सरकारकडून ठोस उपाययोजना होणार आहेत, असे पवार म्हणाले.

# शेतकऱ्यांना जगवण्यासाठी शासनाची मोठी मदत आणि कर्जमाफी करा

## शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे : लातूरमध्ये अतिवृष्टी व पूरग्रस्तांना दिला दिलासा

**लातूर । नदीम पटेल**

शासनाने जाहीर केलेली मदत तुटपुंजी आहे. शेत जमीनच वाहून गेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदतीची गरज आहे. अशा प्रसंगात सरकारने शेतकऱ्यांना तात्काळ भरघोस मदत करावी, अशी मागणी करतानाच शिवसेना पक्ष म्हणून आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले.शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे गुरुवारपासून अतिवृष्टी आणि पूरग्रस्त मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी लातूर तालुक्यातील तांदुळवाडी आणि तांदुळजा येथे शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांच्या सोबत शिवसेना नेते संजय राऊत, चंद्रकांत खैरे, अंबादास दानवे, मिलींद नार्वेकर, आमदार अमित देशमुख, आमदार प्रवीण स्वामी, संपर्क प्रमुख रोहिदास चव्हाण, माजी आमदार धीरज देशमुख, दिनकर माने, शिवसेना जिल्हा प्रमुख संतोष सोमवंशी, बालाजी रेड्डी, उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, नामदेव चाळक, सौ. जयश्रीताई उटगे, सौ. सुनीताताई चाळक, तालुकाप्रमुख कैलास पाटील, विशाल शिंदे, मल्हारी तनपुरे यांच्यासह अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

उध्दव ठाकरे यांनी ही सर्व परिस्थिती शासनापर्यंत पोहोचवणार असून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची मागणी लावून धरणार असल्याचेही सांगितले.शेतकऱ्यांशी संवाद साधताना सरकारने केलेली मदत पुरेशी आहे का ? असा सवाल उध्दव ठाकरे यांनी शेतकऱ्यांना केल्यावर शेतकरी म्हणाले की, सर्व जमीनच वाहून गेली आहे. आता नवीन माती आणून टाकण्यापासून अनेक कामे आहेत. त्यामुळे सरकारने हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करावी, तसेच कर्जमाफी करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.



### सरकारची मदत तुटपुंजी...

**मराठवाडा म्हणजे दुष्काळी भाग आहे, येथे अवर्षण हे नेहमीचे आहे. मात्र, पहिल्यांदाच येथे अतिवृष्टी झाली असून पूरपरिस्थितीचे मोठे संकट ओढवले आहे. आता त्यातून बाहेर पडणे गरजेचे आहे. सरकारने जाहीर केलेली मदत २०२३ च्या निकषांप्रमाणे आहे. त्यामुळे येथील नुकसान पाहता सरकारने जाहीर केलेली मदत तुटपुंजी आहे. सरकारने जाहीर केलेली मदत वेळेवर येते की नाही, याकडेही लक्ष ठेवणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.**

# अमृत भारत एक्स्प्रेसमुळे नंदुरबारहून थेट 'जगन्नाथ पुरी'चा मार्ग मोकळा

## माजी खा.हिना गावित यांच्या हस्ते नंदुरबार स्थानकात हिरवा झेंडा

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील नागरिकांसाठी एक मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे. बहुप्रतिक्षित उधना-ब्रम्हपूर अमृतभारत एक्स्प्रेस या नवीन रेल्वे गाडीला नंदुरबार रेल्वे स्थानकात संसद रत्न माजी खासदार डॉक्टर हिना गावित आणि जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष डॉक्टर सुप्रिया गावित यांनी हिरवा झेंडा दाखवला. यामुळे नंदनगरीतून थेट ओडिशातील जगन्नाथ पुरी येथे जाणाऱ्या असंख्य भाविकांची गैरसोय दूर झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रेल मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी या गाडीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी बोलताना माजी खासदार डॉक्टर हिना गावित यांनी पंतप्रधान मोदी आणि केंद्र सरकारचे विशेष आभार मानले.



देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात जाण्यासाठी नंदुरबार येथून आता रेल्वे गाड्या उपलब्ध होत आहेत. उधना-ब्रह्मपूर एक्स्प्रेसमुळे यात आणखी मोठी भर पडली आहे, असे त्या म्हणाल्या. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, या नवीन एक्सप्रेसला नंदुरबार येथे थांबा मिळाल्यामुळे, येथील भक्तगणांना आता थेट जगन्नाथ पुरीला जाणे शक्य होणार आहे. ही एक्सप्रेस महाराष्ट्र, गुजरात, ओडिशा, आंध्र प्रदेश आणि छत्तीसगड या पाच महत्त्वाच्या राज्यांना जोडणार आहे. या गाडीचं वेळापत्रक १९०२१/१९०२२ क्रमांकाची ही साप्ताहिक सेवा असणार आहे: उधना ते ब्रह्मपूर (१९०२१): ही गाडी दर रविवारी सकाळी ७ वाजून १० मिनिटांनी उधना येथून निघेल आणि ५ ऑक्टोबर २०२५ पासून सेवा सुरू करेल. ब्रह्मपूर ते उधना (१९०२२): ही गाडी दर सोमवारी रात्री ११ वाजून ४५ मिनिटांनी ब्रह्मपूर येथून सुटेल आणि २५ ऑक्टोबर २०२५ पासून सेवा सुरू करेल. या ऐतिहासिक क्षणी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष निलेश माळी, माजी अध्यक्ष सुहास नाईक यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय विज्ञान प्रश्न मंजुषा स्पर्धेत बामखेडे विज्ञान महाविद्यालयाचा हेमकांत प्रथम



**बोरद । मंगेश पाटील**

राष्ट्रीय अवकाश दिनानिमित्त भारती विद्यापीठ तर्फे आयोजित ऑनलाईन, राष्ट्रीय विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेत ग्रामविकास संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय, बामखेडे त.त., ता. शहादा येथील विज्ञान शाखेतील, संगणकशास्त्र विभागाचा प्रथम वर्षाचा विद्यार्थी, हेमकांत रविंद्र चौधरी याने भारतातुन प्रथम क्रमांक मिळवला.सदर विद्यार्थ्याला लवकरच प्रमाणपत्र व ट्रॉफी प्रदान करण्यात येणार असून, याबाबतचे अभिनंदन पत्र भारती विद्यापीठाकडून नुकतेच प्राप्त झाले आहे.

सदर विद्यार्थ्याचा सत्कार संस्थेचे उपाध्यक्ष पी बी पटेल,प्राचार्य डॉ एच एम पाटील,इंजी.रविंद्र जमादार, मानक चौधरी आदिंच्या हस्ते करण्यात आला.हेमकंत यास प्रा. रुचिका तायडे व प्रा. अर्चिता चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. हेमकांतच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव बी. व्ही. चौधरी, उपाध्यक्ष पी. बी. पटेल, संचालक किरण चौधरी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. पाटील यांनी त्याचे अभिनंदन करून भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अतिवृष्टीमुळे खंडीत झालेला वीजपुरवठा सुरुळीत करा-वसंत सुगावे पाटील

**नायगांव । हानुमंत चंदनकर**

नांदेड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे वीज पोल, तारा पडल्यामुळे जिल्ह्यातील अनेक ठिकाणी वीज पुरवठा बंद आहे त्यामुळे दुरुस्तीची कामे तात्काळ पूर्ण करून खंडीत झालेला वीज पुरवठा सुरुळीत करावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशसरचिटणीस वसंत सुगावे पाटील यांनी महावितरण चे अधीक्षक अभियंता यांच्याकडे केली आहे.

जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे अनेक गावांत वीज पोल, तारा पडल्या असून वीज वितरण चे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तसेच अनेक ठिकाणी वीज डी. पी.नादुरुस्त आहेत तर काही ठिकाणी नवीन डी.पी. ची आवश्यकता आहे या सर्व बाबी लक्षात घेऊन महावितरण प्रशासनाने तात्काळ दुरुस्ती करून खंडीत झालेला वीज पुरवठा सुरुळीत करावा अशी मागणी या निवेदनाद्वारे केली आहे.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मा. शहर



कार्याध्यक्ष फेरोज पटेल,राष्ट्रवादी काँग्रेस ग्रंथालय आघाडी प्रदेश कार्याध्यक्ष संतोष दगडगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस सेवादल जिल्हाध्यक्ष रमेश गांजापूरकर, राष्ट्रवादी काँग्रेस अभियंता सेल जिल्हाध्यक्ष बालाजी पा.सोमठाणकर, राष्ट्रवादी काँग्रेस रोजगार सेल प्रदेशसरचिटणीस शेख शफीकआदी पदाधिकारी उपस्थित होते.

## कुपोषणमुक्तीसाठी 'कात्री' ग्रामपंचायतीचा ठाम निर्धार

# डिसेंबर २०२५ पर्यंत संपूर्ण गट ग्राम पंचायत कुपोषणमुक्त करण्याचे उद्दिष्ट

**नंदुरबार । दिपक गोसावी**

बालकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि ग्रामविकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकत, कात्री ग्रुप ग्रामपंचायतीने एक ऐतिहासिक संकल्प केला आहे. सरपंच संदीप वळवी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या विशेष बैठकीत, डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत संपूर्ण कात्री ग्रुप ग्रामपंचायत कुपोषणमुक्त करण्याचा ठाम निर्णय घेण्यात आला आहे. या महत्त्वाकांक्षी उद्देशाच्या पूर्ततेसाठी, आरोग्य अधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, आरोग्य कर्मचारी आणि तालुका वैद्यकीय अधिकारी यांसह सर्व संबंधित घटकांनी



एकत्र येऊन काम करण्याचा निश्चय व्यक्त केला. सामूहिक प्रयत्नांतून कुपोषणाचे उच्चाटन करून 'सुदृढ बालक - समृद्ध ग्राम' हे उद्दिष्ट साध्य करण्याचे नियोजन ग्रामपंचायतीने केले आहे.

कुपोषणमुक्तीचा संकल्प पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायतीने खालील प्रमुख उपक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे:बालकांच्या पोषण स्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून नियमित तपासणी करणे. अंगणवाडी व आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून आहार, स्वच्छता आणि आरोग्याविषयी व्यापक जनजागृती करणे. माता आणि बालकांच्या आरोग्य तपासण्या नियमित आणि वेळेवर आयोजित करणे. संपूर्ण ग्रामपंचायत आरोग्यदायी आणि कुपोषणमुक्त करण्यासाठी सामूहिक सहभाग आणि समन्वयावर जोर देणे. या संकल्पाच्या माध्यमातून कात्री ग्रामपंचायतीने केवळ बालकांच्या आरोग्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण ग्रामविकासाच्या दिशेने एक आदर्श पायंडा पाडला आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जयपूर शाळेतील शिक्षिका सौ.सच्चीता दिक्षीत यांचा निरोप समारंभ संपन्न

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जयपूर (सावळेश्वर) जिल्हापरिषद प्राथमिक शाळेतील शिक्षीका सौ. सच्चीता दिक्षीत यांची अंबाजोगाई येथे बदली झाल्यामुळे जयपूर शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांनी, गावकऱ्यांच्या वतीने निरोप समारंभ घेऊन सत्कार करण्यात आला

जयपूर येथे बदलून आलेल्या शिक्षिका सौ. अर्चना होके यांचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सावळेश्वर गावचे सरपंच श्री.मारूती कांबळे,प्रमूख पाहूणे आनंदगाव येथील शिवाजी पोळ हे उपस्थित होते.सौ. सच्चीता दिक्षीत यांनी



मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की,या शाळेत काम करतांना सर्व स्टाफ विद्यार्थी यांचे मोलाचे सहकार्य लाभले असे भावनिक उद्गार काढून याबद्दल मी सर्वांची आभारी आहे असे सांगितले.प्रमुख पाहुणे यांनी प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी या लहान मुलांना घडविण्याचे काम प्राथमिक शिक्षकच करतात असे अध्यक्ष पदावरून बोलताना शिवाजी पोळ यांनी आपले मत व्यक्त केले. सरपंच मारूतराव कांबळे यांनी सौ. सच्चीता दिक्षीत मॅडम यांनी गेली सात वर्षे या शाळेत ज्ञान दानाचे उत्तम काम तन,मन, धनाने केलेले आहे. घरोघरी पालकांशी संपर्क साधून विद्यार्थ्यांना शिक्षकांची संधी उपलब्ध करून दिली याबाबत सौ. सच्चीता दिक्षीत यांनी उत्तम काम केल्याचे नमूद केले.कार्यक्रमास बालवाडी शिक्षिका आदी स्टाफ उपस्थित होता.कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार श्री. थोरात यांनी मानले. यावेळी नुकत्याच रुजू झालेल्या शिक्षिका सौ. होके अर्चना यांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमास पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सामाजिक कार्यकर्ते किरण शिनगीरे यांची रेशन जनजागृती- जवळपास ९८ टक्के नोंदणी पूर्ण

**आष्टी । रविंद्रनाथ ठाकूर**

वटणवाडी येथील उत्साही व जिद्दी युवा सामाजिक कार्यकर्ते किरण भगवानराव शिनगीरे यांनी गावात रेशन जनजागृती उपक्रम राबवून मोठे कार्य केले आहे. नागरिकांना 'वन नेशन वन रेशन कार्ड' योजनेची सविस्तर माहिती देत, रेशन कार्ड आधार कार्डशी लिंक करणे व नवीन नोंदणी पूर्ण करण्याचे मार्गदर्शन त्यांनी केले.या मोहिमेमुळे गावातील तब्बल ९८ टक्के नागरिकांची नोंदणी यशस्वीरीत्या पूर्ण झाली असून गावाला रेशन व्यवस्थेत डिजिटल व पारदर्शक क्रांतीकडे नेण्याचा हा पाऊल ठरला आहे.यावेळी गावातील नागरिकांमध्ये बबन वायकर,छगन शिनगिरे,दिलीप शिनगिरे, सुरेश शिरोळे,विष्णू पोकळे, महादेव भोसले आदींची उपस्थिती लक्षणीय होती.युवा पिढीच्या पुढाकारातून गावात घडलेले हे जनजागृतीचे कार्य



गावकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077